**Bachelor of Arts (B.A.) Part—II Examination**

**MARATHI (New)**

**(Compulsory)**

**(Other Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. ताराबाई शिंदेनी केलेली 'स्त्रीपुरूषतुलना' स्पष्ट करा.

**किंवा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षकांचा भाग्यविधाता म्हणून कसा गौरव करतात ? 10

2. कुसुम अलाम यांच्या 'न्यायासाठी' या कवितेतील आशयसौंदर्य उलगडून दाखवा.

**किंवा**

'भला जन्म हा तुला लाभला' या कवितेचे रसग्रहण करा. 10

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **शंभर** शब्दांत लिहा :

**गट 'अ'**

(क) उत्तम वक्ता होण्यास काय तयारी करावी लागते, याची माहिती तुमच्या शब्दांत लिहा.

(ख) 'रूंभणेयाचा दृष्टान्ताचा' अर्थ स्पष्ट करा.

(ग) 'विराणी' कवितेतून व्यक्त होणाऱ्या कविमनातील उदासीनतेचे वर्णन करा.

(घ) संत नामदेवांनी 'तुळशीचे महत्व' कशा प्रकारे सांगितले आहे ?

**किंवा**

**गट 'ब'**

(च) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नव्या भारताचे युग पाहत होते, याची जाणीव लेखकांनी कशाप्रकारे करून दिलेली आहे ?

(छ) यशस्वी वक्त्याची कोणती लक्षणे आचार्य अत्रे ह्यांनी सांगितलेली आहेत ?

(ज) 'स्मरण' कवितेतील कवीने केलेले मृत्यूचिंतन स्पष्ट करा.

(झ) कवी यशवंतांनी शेतक-याच्या दयनीय स्थितीचे वर्णन कशा प्रकारे केले आहे ? 20

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे **शंभर** शब्दांत लिहा :

**गट 'क'**

(त) बातमी म्हणजे काय ? बातमी लेखनाची पद्धती सांगा.

(थ) 'इतिवृत्त' लेखन करताना कोणती काळजी घ्यावी, ते स्पष्ट करा.

(द) वृत्त-भाषांतर म्हणजे काय ? स्पष्ट करा.

(ध) कोणकोणत्या प्रसंगाच्या निमित्ताने मुलाखत घेतली जाऊ शकते ?

**किंवा**

**गट 'ड'**

(प) 'चौकटीतील बातमी' कशी असावी, ते सांगा.

(फ) इतिवृत्त लेखनाची पद्धती स्पष्ट करा.

(ब) मुलाखत लेखनाच्या तंत्राचे स्वरूप स्पष्ट करा.

(भ) भाषांतराचे प्रकार सांगून, भाषांतराची पूर्वतयारी कशी करावी, ते लिहा. 20

5. खालील **सर्व** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :

(1) 'दृष्ट प्रवृत्ती पराभूत व्हावी, यासाठी नवी पहाट उगवत आहे ? असे निर्मलकुमार फडकुले घ्यांनी का म्हटलेले आहे ?

(2) दुर्गा भागवत माघ महिन्याला 'मायावी माद्य' का म्हणतात ? थोडक्यात सांगा.

(3) मारोपंतांनी 'सत्संगाचा महिमा' कसा वर्णन केला आहे ?

(4) समाजातील वास्तवदर्शनातून संघर्षाची चिंगारी नारायण सुर्वे ह्यांच्या मनात कशा प्रकारे प्रज्वलित झालेली आहे ? 20

6. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा :

(1) श्री चक्रधरस्वामींनी रूंभणेयाचा दृष्टांत कुठे सांगितला ?

(अ) आळंदी (ब) देहू

(क) पंठरपूर (ड) पैठण

(2) 'स्त्रीपुरूषतुलना' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(अ) दुर्गा भागवत (ब) रमाबाई रानडे

(क) इरावती कर्वे (ड) ताराबाई शिंदे

(3) कोणत्याही संताच्या चिंतनाचा आणि कार्याचा केंद्रबिंदू ________ हाच असतो.

(अ) माणूस (ब) लेखक

(क) कवी (ड) निसर्ग

(4) 'गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या, म्हणजे तो आपोआपच बंड करील' असे कोण म्हणतात ?

(अ) महात्मा गांधी (ब) लो. टिळक

(क) डॉ. आंबेडकर (ड) यापैकी नाही

(5) फ्र.के. क्षेत्र यांचे टोपण नाव काय ?

(अ) केशवसुत (ब) केशवकुमार

(क) बालकवी (ड) गोविंदाग्रज

(6) 'स्मरण' ही कविता यांनी लिहिली ________ .

(अ) यशवंत (ब) सुरेश भट

(क) ना.धो. महानोर (ड) कवी अनिल

(7) 'कायदा सुव्यवस्था मला सांभाळायची आहे !' असे कुणी म्हटले ?

(अ) यशवंत मनोहर (ब) नारायण सुर्वे

(क) अंजनाबाई खुणे (ड) कुसुम अलाम

(8) 'डोळे' ही कविता कुणी लिहिली ?

(अ) सुरेश भट (ब) यशवंत मनोहर

(क) भाऊ पंचभाई (ड) कवी अनिल

(9) 'श्लोक केकावली' हे काव्य कुणी लिहिले ?

(अ) रघुनाथ पंडित (ब) दामोदर पंडित

(क) मारोपंत (ड) भास्करभट्ट बोरीकर

(10) "हा माझाही देश; आणि त्यातील हे पोकेपोकेसे लोक आपल्या घरालाच असे पोकेपण यावे ; तर काय करावे ?" असे कोणी म्हटले ?

(अ) मर्ढेकर (ब) केशवसुत

(क) नारायण सुर्वे (ड) लोकनाथ यशवंत

(11) एखादी घटना लोकांना कळावी म्हणून तिची वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याजोगी माहिती म्हणजे ________.

(अ) वृतान्त (ब) बातमी

(क) माहिती (ड) घटना

(12) भाषांतराचा पहिला प्रकार कोणता ?

(अ) वस्तुनिष्ठ भाषांतर (ब) लक्ष्यनिष्ठ भाषांतर

(क) मूलनिष्ठ भाषांतर (ड) यापैकी नाही

(13) मराठीतील पहिले वृत्तपत्र ________ हे होय :

(अ) सुधारक (ब) केसरी

(क) दर्पण (ड) लोकमत

(14) मुलाखत हा मानवी व्यक्तिमत्वाचा साक्षात ________ एक प्रकार आहे.

(अ) लेखनाचा (ब) वाचनाचा

(क) अभिव्यक्तीचा (ड) प्रचाराचा

(15) 'अग्रलेख लिहिणे ही पत्रकाराची वार्षिक परीक्षा असते' असे कोणी म्हटले आहे ?

(अ) आचार्य अत्रे (ब) महात्मा गांधी

(क) कार्लाईल (ड) लोकमान्य टिळक

(16) अहवालात्मक इतिवृत्त कशा स्वरूपाचे असते ?

(अ) रचनात्मक | (ब) वर्णनात्मक

(क) प्रश्नात्मक | (ड) चिकित्सक आणि विश्लेषणात्मक

(17) बातमी लिहिताना लेखकाला कशाची माहिती असायला हवी ?

(अ) संवादशास्त्र | (ब) भाषाशास्त्र

(क) मुद्राक्षर रचनाशास्त्र | (ड) शैलीशास्त्र

(18) व्यक्तीच्या आयुव्यातील कोणत्याही महत्वपूर्ण व कुतूहलजनक प्रसंगाच्या निमित्ताने ______ घेतील जाऊ शकते.

(अ) भेट | (ब) मुलाखत

(क) परीक्षा | (ड) यापैकी नाही

(19) बातमीची यशस्विता ________ अवलंबून असते.

(अ) लेखनावर | (ब) वर्तमानपत्राच्या प्रतिळेवर

(क) बातमीदारावर | (ड) घटनेवर

(20) स्मरणात ठेवण्यासाठी 'टिपणे' असा ________ या संज्ञेचा अर्थ आहे.

(अ) इतिवृत्त किंवा नोंदी | (ब) अहवालात्मक इतिवृत्त

(क) वर्णनात्मक इतिवृत्त | (ड) यापैकी नाही 20